# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangster**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **13/09/2022**

**Brief of the work done :-**

दरोड्याच्या तयारीत असलेले दरोडेखोर जेरबंद ; दरोड्यासाठीच्या साहित्यासह 05 दरोडेखोर ताब्यात.

लोकमत

## दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना रिसोड पोलिसांनी पकडले



**तलवार, चाकू जप्त**

आरोपींच्या ताब्यातून एक चाकू, लोखंडी तलवार, दोरी, दोन लोखंडी पाइप, मिरची पूड व एक तवेरा वाहन जप्त करण्यात आले.

**रिसोड** : रिसोड तालुक्यातील भापूर शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना रिसोड पोलिसांनी मोठ्या शिताफीने पकडल्याची घटना १२ सप्टेंबर रोजी पहाटे तीन वाजेदरम्यान घडली. अंधाराचा फायदा घेत एक दरोडेखोर फरार होण्यात यशस्वी झाला.

शहर व ग्रामीण भागात चार वाहनांद्वारे रात्रीची पेट्रोलिंग करण्यात येते. १२ सप्टेंबर रोजी पहाटे २ वाजेदरम्यान पेट्रोलिंगदरम्यान वाशिम-बुलडाणा जिल्ह्याच्या हद्दीवर रिसोड पोलीस स्टेशनअंतर्गत काही इसम दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलीस कर्मचारी एकाडे यांना मिळाली. या माहितीवरून पोलीस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर यांनी तत्काळ भापूर शिवारात शोध मोहीम सुरू केली. यादरम्यान भापूर गावाच्या शिवारात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेले ६ इसम एका वाहनामध्ये संशयास्पद स्थितीत दिसून आले. पोलिसांना पाहून दरोडेखोर पळून जात असताना पाठलाग करून पाच जणांना पकडण्यात आले. अंधाराचा फायदा घेत एक दरोडेखोर फरार होण्यात यशस्वी झाला. या आरोपींवर वाशिम, मेहकर, डोणगाव, जानेफळ पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल असून ते सराईत गुन्हेगार असल्याचे सांगण्यात येत आहे. आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३९९, ४०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनीलकुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर, सपोनि गायकवाड, कर्मचारी एकाडे, मुकाटे, अंभुरे, सरकटे यांनी केली.